# खंडणीच्या गुन्ह्यातील कासव, युनिट-३ कडून हस्तगत

मार्केटयार्ड पोलीस ठाणे गुरनं २२/२०१७ भादविक ३८५, ३८७, ५१७, १७० मधिल फिर्यादी इम्रान उस्मान शेख, रा. अलअमिन सोसा, मार्केटयार्ड पुणे यांना दिनांक २८/०१/२०१७ रोजी तुंम्ही बेकायदेशीर कासव खरेदी विक्री डिलींग करता, हे आंम्हास माहित झाले आहे, आंम्ही पोलीस असून आंम्हास ४० लाख रुपये दे, नाहीतर तुला व तुझ्या पत्नीस अटक करु असा धमकीवजा फोन आला होता. म्हणून वरिलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दाखल गुन्ह्याचा समांतर तपास करीत असताना, आरोपी मतिन फिरोज शेख रा. बिबवेवाडी पुणे व आरोपीत मुलगी यांना युनिट-३ कडून दिनांक ०२/०२/२०१७ रोजी अटक करण्यात आली होती.

तपास करीत असताना यातील फिर्यादी यांचेकडे कासव आहे अगर कसे याबाबतची माहीती काढता, त्यांचेकडे १ कासव असल्याची खातरजमा झाल्याने वनपरिक्षेत्र अधिकारी श्री विजय गायकवाड यांना बोलावून घेवून फिर्यादी यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी त्यांचेकडे कासव जातीचे प्राणी असल्याचे सांगून ते हजर केले आहे. त्याचे वर्णन चॉकलेटी रंगाचा, अंदाजे ५.५ इंच रूदीचे, वजन ५०० ग्रॅम असलले. नमुद कासवाची आंतरराष्ट्रीय बाजारापेठेत किंमत अमुल्य असल्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी सांगीतले आहे.

सदरचे कासव हे राजीव गांधी प्राणी संग्रहालय कात्रज पुणे यांचेकडे पाठवीण्याची तजवीज केली आहे.

वरील कामगिरी गुन्हे शाखेचे श्री.दिपक साकोरे, अतिरिक्त कार्यभार अपर पोलीस आयुक्त, श्री.पी.आर.पाटील, पोलीस उप-आयुक्त, श्री.सुरेश भोसले, सहाय्यक पोलीस आयुक्त, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सिताराम मोरे, सहा.पोलीस निरीक्षक श्री.रविंद्र बाबर, पोलीस उप निरीक्षक, श्री प्रकाश अवघडे, सहा.पो.उप निरीक्षक अशोक भोसले, अनिल घाडगे, गुणशिलन रंगम, राजु रासगे, गजानन गणबोटे, अतुल साठे, संदीप राठोड, संदीप तळेकर, यांनी केली आहे.